<u>**निवेदन**</u>

**दिनांक: / /2020.**

**प्रति ,**

मा.आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
तिसरा मजला सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०३०.

**विषय : नगरविकास विभागात कार्यरत संवर्ग कर्मचा-यांचे सेवार्थ आयडी तयार करणे व त्यांना लागू असलेली राष्ट्रीय निवृत्तीवेतन (National Pension Scheme) योजनेबाबत.**

**संदर्भ** : १) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४ दि. ३१/१०/२००५.
२) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो २०१२/प्र.क्र.९६ सेवा-४ दि. २१/०८/२०१४.
३) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अंनियो २०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४ दि. ०६/०४/२०१५.

**मा. महोदय / महोदया,**

आम्ही खाली सही करणारे, सविनय निवेदन करतो की, उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आमची नियुक्ती महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय सेवा संवर्ग अंतर्गत मा. जिल्हाधिकारी व तद्नंतर मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे आदेशान्वये करण्यात आली आहे. आमचे नियुक्ती आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने राज्यशासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी जुन्या पेंशन योजने ऐवजी लागु केलेली परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना (Defined Contribution Pension System) लागू राहील असे नमुद आहे.

तसेच संदर्भ क्र. २ नुसार महाराष्ट्र शासनाने परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना (Defined Contribution Pension System DCPS) ऐवजी केंद्रशासनाची राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (National Pension Scheme NPS) लागू केली आहे.

तसेच सदर निवृत्तीवेतन योजना लागु करणे करीता संदर्भ क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी आहरण व संवितरण अधिकारी (DDO) व सहाय्यक आहरण व संवितरण अधिकारी (ADDO) यांचे मार्फतच करणे आवश्यक आहे. याकरीता सर्वप्रथम सेवार्थ प्रणालीमधे आमची पदे निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच संबधित DDO व ADDO यांचे सेवार्थ प्रणाली मधील लॉगीन आयडी मधून आमचे सेवार्थ आयडी तयार करणे

बंधनकारक आहे. जेणेकरुन त्या आयडीतुन आमचे निवृत्तीवेतन अंशदानाच्या कपाती वेळोवेळी NPS खात्यात जमा करता येतील.

नगर विकास विभागा मध्ये सन २०१३ पासुन संवर्ग कर्मचारी कार्यरत आहेत. सदयस्थितीत बहुतांश कर्मच्याऱ्यांच्या वेतनातून परिभाषित अंशदानाची रक्कम व नगरपरिषद/नगरपंचायत यांचा हिस्सा संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीने उघलेल्या एका बॅक खात्यामध्ये जमा केला जातो. सदर रक्कम संबधित नगरपरिषद/नगरपंचायत यांच्या बॅक खात्यात पडून आहे. त्यावर कर्मचारी यांना गुंतवणुकीवरील कोणतेही लाभ जमा होत नसून निवृत्ती-पश्चात एकमेव उपजीविकेचे साधन असलेल्या रकमेवरील लाभावर याचा अनिष्ट परिणाम होत आहे. सदर रक्कम अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension System DCPS) व त्यायोगे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (National Pension Scheme NPS) खाते काढूण त्यावर जमा करणे आवश्यक आहे. तसेच संवर्ग कर्मचारी यांना योग्य गुंतवणुक म्हणजे NPS मध्ये गुंतवणुक न झाल्याने होणाऱ्या तोटयाबाबत निर्णय घेऊन त्याची भरपाई करणे आवश्यक आहे. तरी आमचे एनपीएस खाते लवकरात लवकर उघडले गेल्यास सध्या होणारे नुकसान टाळता येणे शक्य आहे.

नगर विकास विभागामधील सन २००५ पुर्वीचे कर्मचारी ज्यांचे सन २००८, २०१०, २०१२ मध्ये मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे मार्फत संवर्गात समावेशन झालेले आहे. सदर कर्मचा-याना जुनी पेंशन योजना लागु आहे. परंतु **सदरचे कर्मचारी यांचे सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवार्थ प्रणाली मधुन सेवार्थ क्रमांक तयार करणे गरजेचे असते जेणेकरुन सदर कर्मचा-याना त्यांचे सेवानिवृत्ती नंतरचे लाभ सहज मिळु शकतील. (उदा. पेंशन, उपदानाचे बील, रजा रोखीकरण इ.) याकरीता त्यांचा सेवार्थ प्रणाली मार्फत सेवार्थ क्रमांक तयार करणे आवश्यक आहे.**

NPS योजना आम्हाला लागू असून सुद्धा याची अंमलबजावणी अद्याप पावेतो करण्यात आलेली नाही. शासनाने जुनी निवृत्ती वेतन योजना बंद केल्यामुळे सेवानिवृत्ती अखेर NPS मधे जमा झालेले अंशदान हे आमचे उपजिवीकेचे एकमेव साधन राहणार आहे. त्यामुळे याप्रकरणाचे गांभीर्य आपण कमीत कमी आमची पदे सेवार्थ प्रणालीत संमिलीत करुन NPS खात्यात अंशदानाची रक्कम भरण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. जोवर NPS खात्यात नियमा नुसार नियमीत निवृत्ती अंशदान जमा होत नाही, तोवर त्याचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

उपरोक्त नमूद मागणीनुसार खालील **मुख्य मागण्यांची** त्वरित पूर्तता करून मिळावी.

१. सेवार्थ प्रणालीमध्ये नगरपरिषद/नगरपंचायती मध्ये कार्यरत संवर्गातील कर्मचारी यांचे सेवार्थ क्रमांक तयार करून संवर्ग कर्मचाऱ्यांची माहिति सेवार्थ प्रणाली मध्ये समाविष्ट करण्यात यावी.
२. सेवार्थ प्रणालीत नव्याने स्थापन केलेली तथा भरती केलेली पदे संमिलीत करणे तसेच DDO व ADDO निश्चित करणे आवश्यक आहे. सदर प्रकीया केल्यास दर महिन्याला कर्मचारी यांचे कपात केलेले वेतन व नगरपरिषद/नगरपंचायत यांचे अंशदान NPS खात्यात जमा होऊन कर्मचारी यांना गुंतवणूकीचे लाभ मिळतील आणि भविष्यात सरकावरही याबाबतचा बोजा पडणार नाही.

३. उपरोक्त उल्लेखलेले सर्व संवर्ग कर्मचारी यांचे NPS खाते उघडून दरमहा कपात करण्यात येणारे निवृत्तीवेतन अंशदान त्या खात्यात वेतनासोबत जमा करण्यात यावे. जेणेकरून गुंतवणूकीवरील रकमेवर योग्य मोबदला सर्व संवर्ग कर्मचारी यांना मिळू शकेल.

तरी वरील बाबतीत उचित कार्यवाही त्वरीत करण्यात यावी, ही नम्र विनंती.

आपले विश्वासु

स्वाक्षरी/-

(सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे सर्व कर्मचारी)

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर:**

1. मा. श्री. एकनाथ शिंदे साहेब. कॅबिनेट मंत्री, नगरविकास, महाराष्ट्र शासन.
2. मा. प्रधानसचिव सचिव (2), नगरविकास विभाग, 4 था मजला, मंत्रालय मुंबई-400 003.

**प्रत माहिती साठी सविनय सादर:**

3. मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, _________.
4. मा. जिल्हाधिकारी तथा तत्कालीन नियुक्ती प्राधिकारी, _______.